नियमीत दिवाणी दावा क्र. १३/२०१६
मुस्तकीम वि. मुजफ्फर

## निशाणी क्र. ३३ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने त्यांच्या अगोदर निशाणी क्र. ३२ कडील अर्जानुसार स्वतःची साक्ष दाव्याचा नंतरच्या टप्प्यामध्ये तपासण्याचा हक्क राखून इतर साक्षीदारास तपासण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करून प्रस्तूत अर्जामध्ये वादी स्वतःला तपासण्या अगोदर इतर साक्षीदार का तपासत आहे याचा खुलासा केला नाही. इतर साक्षीदार स्वतःचा पुरावा डावलून तपासण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण नाही. त्यामुळे २०००/- रुपये खर्चासह अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी मागणी केली आहे. प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. पी. एच. वर्तक यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे वकील युक्तीवादाकामी गैरहजर राहीले. प्रतिवादीच्या विद्वान वकीलांनी अर्जामध्ये वादी स्वतःला तपासण्या अगोदर इतर साक्षीदार का तपासत आहे याचे कोणतेही कारण नमूद नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यात यावा असा युक्तीवाद केला.

२. दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. १८ नियम ३ अ नुसार पक्षकार स्वतःला साक्षीदार म्हणून तपासण्यात इच्छुक असल्यास, जर न्यायालयाने कारणे नमूद करून पक्षकारास तशी परवानगी दिली असल्या खेरीस, पक्षकाराने इतर साक्षीदारांअगोदर साक्षीदार म्हणून तपासणे आवश्यक आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये वादीने निशाणी क्र. ३२ कडे अर्ज देवून इतर साक्षीदारास साक्षी समन्स काढण्याची मागणी केली आहे. प्रस्तूत अर्जाद्वारे वादीने स्वतःला तपासण्याचा हक्क राखून निशाणी क्र. ३२ कडील अर्जानुसार साक्षीदार तपासण्याची परवानगी मागितली आहे. प्रस्तूत अर्जामध्ये वादी इतर साक्षीदार स्वतः अगोदर का तपासत आहे याचे कारण नमूद केले नाही. प्रस्तूतचा दावा सन २०१६ पासून प्रलंबित असून दिनांक १४/०२/२०१८ रोजी वाद मुद्दे निश्चित करण्यात आले आहे. वादीने अजून पर्यंत स्वतःला साक्षीदार म्हणून तपासले नाही. परंतू, वादीने स्वतःला साक्षीदार म्हणून दाव्याच्या नंतरच्या टप्प्यामध्ये तपासण्याचा हक्क राखून इतर साक्षीदार तपासण्याची मागणी केली आणि अर्जामध्ये

कारण नमूद केले नाही या कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज फेटाळणे न्यायोचित होणार नाही या मतास मी पोहचलो आहे. याशिवाय प्रस्तूतचा अर्ज मंजूर केला गेल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता मी खालील आदेश पारीत करतो -

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०२/०३/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड